महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं/२/१०(५)/स.सा.बदल्या-२०२४/४९/२०२४. दिनांक :- ०८/०४/२०२४.

संदर्भ :- १. महाराष्ट्र पोलीस अधिनियम (सुधारणा) अध्यादेश क्र.३/२०१४, दिनांक ०१/०२/२०१४, व
२. महाराष्ट्र पोलीस (सुधारणा) अधिनियम, २०१५ दि.०६/०४/२०१५

विषय :- **सर्व साधारण बदल्या - २०२४ :**
पोलीस उपअधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त / सहायक समादेशक (नि:शस्त्र / सशस्त्र / मोटार परिवहन / बिनतारी संदेश (अभियांत्रिकी) इ.) या संवर्गातील अधिकाऱ्यांच्या सार्वत्रिक बदल्या-२०२४ करीता माहिती पाठविण्याबाबत.

* * * * *

संदर्भाधिन अधिसूचनेमधील तरतुदींच्या अधिनराहून सन-२०२४ साठी पोलीस उप अधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त दर्जाच्या सर्व संवर्गातील अधिकाऱ्यांच्या वार्षिक सर्वसाधारण बदल्या करण्याचे प्रस्तावित आहे. त्याअनुषंगाने :-

१. सध्याच्या नेमणुकीच्या पदात **दि. ३१/०५/२०२४ पर्यंत २ वर्षे पूर्ण करणार आहेत,** अशा पोलीस उप अधीक्षक / सहायक पोलीस आयुक्तांकडून बदलीकरिता त्यांच्या पसंतीच्या ठिकाणांची माहिती घेऊन सोबत जोडलेल्या **विवरणपत्र-"अ"** मध्ये भरुन संबंधीत घटक प्रमुखांनी ती निश्चितपणे **दि. २५/०४/२०२४** पुर्वी या कार्यालयास पाठवावी.

२. अधिकाऱ्यांची माहिती विवरणपत्रात भरतांना ती संबंधीतांच्या सेवापुस्तकांतील प्रमाणित नोंदींनुसार बरोबर असल्याची निश्चीत खात्री करावी.

३. अधिकाऱ्यांविरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक कलमान्वये गुन्हा दाखल असल्यास, अथवा विभागीय चौकशी सुरु असल्यास ती बाब विवरणपत्रामध्ये स्पष्टपणे नमूद करावी. तसेच, न्यायालयीन प्रकरण / विभागीय चौकशी किंवा एखादे अन्य प्रकरण प्रस्तावित / प्रलंबित आहे किंवा कसे, किंवा सध्या यापैकी कोणी एखादी शिक्षा भोगत असल्यास सदरची शिक्षा केव्हा सुरु झाली, व ती केव्हा संपणार, इत्यादींबाबतचा सविस्तर अहवाल सोबतच्या विवरणपत्रात भरुन पाठवावा.

४. तसेच, संबंधीतांना स्पष्ट कल्पना द्यावी की, पसंतीच्या ठिकाणी प्रशासकीयदृष्ट्या शक्य असेल तरच बदली करण्याकरिता दिलेल्या विकल्पांचा विचार करण्यात येईल.

५. सदरची माहिती DVBW-TTSurekh मध्येच टंकलिखित करुन, परिपत्रकासोबत जोडलेल्या विवरण पत्राप्रमाणेच योग्य रकान्यात योग्य माहिती नमूद करुन, बिनचूक सेवातपशीलासह

दि.२५/०४/२०२४ पर्यंत या कार्यालयातील कार्यासन क्रमांक ०२ वर **ई-ऑफीस प्रणालीव्दारे** तसेच या कार्यालयाच्या **desk2.dgoffice@mahapolice.gov.in** या ईमेलवर पाठवावी.

६. ज्या अधिकाऱ्यांना **विनंतीवरुन** मुदतपुर्व बदली हवी आहे, त्यांची स्वतंत्र माहिती **विवरणपत्र-"ब"** मधील रकान्यात योग्य माहिती भरुन, त्यांचे अर्जातील बाबी खऱ्या आहेत किंवा कसे, तसेच **स्पष्ट अभिप्रायासह दि. २५/०४/२०२४** पूर्वी या कार्यालयास पाठवावी.

( संजीव कुमार सिंघल )
अपर पोलीस महासंचालक (आस्थापना)
महाराष्ट्र राज्य, मुंबई

**प्रति,**

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह)
महासंचालक, अॅन्टी करप्शन ब्युरो, महाराष्ट्र राज्य, मुंबई (सस्नेह)
पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई (सस्नेह).
पोलीस महासंचालक,दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य, मुंबई (सस्नेह).
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, म.राज्य.पुणे / वाहतुक मुंबई / आ.गु.शा.,म.राज्य, मुंबई/ प्रशिक्षण व खास पथकें, म.राज्य, मुंबई/ फोर्स वन,मुंबई / ना.ह.सं.राज्य,मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्ग मुंबई सह व बृहन्मुंबई वगळून)
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / नक्षल विरोधी अभियान, नागपूर / वि.सु.वि., दादर, मुंबई/ महाराष्ट्र सायबर / मा.राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई
विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे
पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर.
सर्व पोलीस अक्षीक्षक (लोहमार्ग / विसुवि, दादर / पो.बि.सं., पूर्व विभाग, नागपूर व पश्चिम विभाग, पुणे / राज्य पोलीस नियंत्रण कक्ष, मुंबई सह )
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. १ ते १९
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण विद्यालये./ अ.अ.प्र.क्रे., नागपूर
उपसंचालक, गुन्हे अन्वेषण प्रकटीकरण विद्यालय, नाशिक
पोलीस अधीक्षक, राज्य पोलीस नियंत्रण कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई

**प्रत माहिती व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीकरीता सस्नेह अग्रेषित :-**

आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
सर्व उपायुक्त तथा उपाध्यक्ष, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती.
सर्व उप संचालक, जिल्हा जात प्रमाणपत्र समिती.
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे१
संगणक कक्ष, राज्य पोलीस मुख्यालय, मुंबई.

२. सदरचे ज्ञापन **"पोलीस उप अधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त / सहायक समादेशक (नि:शस्त्र/ बिनतारी संदेश (अभि.)/ मोटार परिवहन) या संवर्गाच्या सर्वसाधारण बदल्या-२०२४"** या शिर्षाखाली महाराष्ट्र पोलीस दलाच्या संकेत स्थळावर पुढील एक महिन्यासाठी प्रसिध्द करावे.

# विवरणपत्र-"अ"

पोलीस उप अधीक्षक/ सहायक पोलीस आयुक्त संवर्गातील
अधिकाऱ्यांच्या "सर्वसाधारण बदल्या -२०२४"

| | | |
|---|---|---|
| १. | नांव :- | |
| २. | सध्याची नेमणूक व कार्यरत दिनांक | |
| ३. | घोषित मूळ जिल्हा :- | |
| ४. | सेवानिवृत्तीचा दिनांक:- | |
| ५. | १. लाचलुचपत प्रतिबंधक कलमान्वये गुन्हा दाखल असल्यास अथवा विभागीय चौकशी प्रलंबित असल्यास त्याबाबतची माहिती<br>२. शिक्षा प्रस्तावित किंवा प्रलंबित असल्यास त्याबाबतची माहिती द्यावी. | |

| पूर्वीच्या नेमणुका (परिपूर्ण व अचूक सेवातपशील) | | | पसंतीची तीन ठिकाणे | घटक प्रमुखांचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| घटक | कालावधी | | | |
| | पासून | पर्यंत | | |
| पोलीस उप निरीक्षक<br>सहायक पोलीस निरीक्षक<br>पोलीस निरीक्षक<br>पो उप अ/ सहा पो आ | | | (अर्जदाराची स्वाक्षरी) | (घटक प्रमुखाची स्वाक्षरी) |

GT 2023 Memo

# विवरणपत्र-"ब"

पोलीस उप अधीक्षक/ सहायक पोलीस आयुक्त संवर्गातील
अधिकाऱ्यांच्या "विनंती बदल्या -२०२४"

| | | |
|---|---|---|
| १. | नांव :- | |
| २. | सध्याची नेमणूक व कार्यरत दिनांक | |
| ३. | घोषित मूळ जिल्हा :- | |
| ४. | सेवानिवृत्तीचा दिनांक:- | |
| ५. | १. लाचलुचपत प्रतिबंधक कलमान्वये गुन्हा दाखल असल्यास अथवा विभागीय चौकशी प्रलंबित असल्यास त्याबाबतची माहिती<br>२. शिक्षा प्रस्तावित किंवा प्रलंबित असल्यास त्याबाबतची माहिती द्यावी. | |

| पूर्वीच्या नेमणुका (परिपूर्ण व अचूक सेवातपशील) | | | विनंती अर्जाची माहिती | घटक प्रमुखांचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| घटक | कालावधी | | | |
| | पासून | पर्यंत | | |
| पोलीस उप निरीक्षक<br><br>सहायक पोलीस निरीक्षक<br><br>पोलीस निरीक्षक<br><br>पो उप अ/ सहा पो आ | | | (अर्जदाराची स्वाक्षरी) | (घटक प्रमुखाची स्वाक्षरी) |

GT 2023 Memo